**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्रातील ग्राह्य झोपडपट्टीधारकांना, पुनर्वसन प्रकल्पात २५.०० चौ. मी. ऐवजी २७.८८ चौ. मी. (३०० चौ. फुट) क्षेत्राची निवासी सदनिका देणेबाबत, मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदींच्या अनुषंगाने, कलम ३७(१) व १५४ अन्वये निदेश...

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**शासन निर्णय क्र. टिपीएस- १८२२/अनौसं-९/२२/प्र.क्र.२८/२०२२/नवि-१३**
**दिनांक : ०८.०३.२०२२.**

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६*

**प्रस्तावना:-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्राकरीताची (यापुढे ज्याचा उलेख "उक्त क्षेत्र" असा करण्यात आला आहे) विकास नियंत्रण नियमावली (यापुढे जिचा उलेख "उक्त विकास नियंत्रण नियमावली" असा करण्यात आला आहे) शासनाच्या नगर विकास विभागाची अधिसूचना क्र.टिपीएस-१८१२/७८६/प्र.क्र.२६२/१३/पुर्नबांधणी क्र.९०/नवि-१३, दि.११.०९.२०१४ (यापुढे जिचा उलेख "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) अन्वये मंजूर झालेली आहे. तर उक्त क्षेत्राकरीता प्रारुप सुधारित विकास नियंत्रण नियमावली दि.२९.०९.२०२१ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीमधे, मुंबई शहराकरीता तसेच एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीनुसार अंतर्गत अन्य शहरांकरीता लागू करण्यात आलेल्या पुनर्वसन सदनिकेच्या २७.८८ चौ.मी. (३०० चौ.मी.) चटई क्षेत्रफळाच्या आधारावर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे कार्यक्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांमधील पुनर्वसन सदनिकेकरीता २५.०० चौ.मी. (२६९ चौ.मी.) ऐवजी २७.८८ चौ.मी. (३०० चौ.मी.) चटई क्षेत्रफळाची निवासी सदनिका देणेबाबत तरतूद प्रस्तावित आहे. या अनुषंगाने, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे अंतर्गत सुरू असलेल्या नवीन प्रस्तावांमध्ये झोपडपट्टीधारकांची ३०० चौ. फुट चटई क्षेत्रफळाची निवासी सदनिका मिळावी, अशी सातत्याने मागणी होत असल्याची बाब विचारात घेऊन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी, सार्वजनिक हित विचारात घेऊन, या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश देण्याची विनंती शासनाच्या गृहनिर्माण विभागास केली असून, गृहनिर्माण विभागाने उक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वये निर्देश निर्गमित करण्यास मान्यता देण्याची विनंती केली आहे.

उक्त बाब विचारात घेता तसेच प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीस अंतिमरित्या मान्यता मिळून ती अंमलात येण्यास लागणारा कालावधी व मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी दि.१३.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, उक्त क्षेत्रातील प्रकल्प त्वरेने होण्यासाठीची नमूद केलेली कारणमिमांसा तसेच सार्वजनिक हित विचारात घेता शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे, पुणे व

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI-32



Scanned with Oken Scanner

पिंपरी-चिंचवड यांना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) सह कलम १५४ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन खालीलप्रमाणे निदेश देत आहे :-

*'निदेश*

"झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्राच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे क्षेत्रातील पात्र झोपडपट्टीधारकांना, पुनर्वसन प्रकल्पात २५.०० चौ. मी. ऐवजी २७.८८ चौ. मी. (३०० चौ. फुट) चटई क्षेत्राची निवासी सदनिका देणेबाबतची तरतूद अंतर्भूत करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी, उक्त विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल करण्यासाठी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये आवश्यक ती वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी सादर करावा.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम १५४ मधील तरतूदीनुसार सदर तरतूद निदेशाच्या दिनांकापासून लगोलग लागू करण्यात येत आहे."

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.*

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

Gokhale

(किशोर वि. गोखले)

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति:-**

मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

**प्रत माहितीसाठी :-**

१) प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे.
३) आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, जि. पुणे.
४) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे,
५) सह संचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.
६) सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे.



Scanned with Oken Scanner